Server Comprehensive - AMC

दुरूस्ती व देखभाल करणेबाबत जाहीर नोटीस

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते की, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांचे अधिपत्याखाली असणा-या तालुका न्यायालयातील वापरात असलेले २० सर्व्हर्स यांची स्थानिक पातळीवर (**Comprehensive-AMC with all components)** दुरूस्ती व देखभाल वार्षिक करार करणेसाठी मूळ रक्कमेच्या ६% टक्के या कमाल दराने मोहोरबंद दरपत्रक (निविदा) मागविणेत येत आहे. तरी इच्छूक सेवाधारकांनी सदरची जाहिरात प्रसिध्द झालेपासून आठ दिवसांचे आत **२० सर्व्हर्स (Servers)** ची पहाणी व माहिती घेणे करिता मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील संगणक विभाग येथे प्रत्यक्ष भेट देवून सदरची निविदा भरणेचे आहे. नोंदणीकृत व इच्छूक सेवाधारकांकडून सदरची जाहिरात प्रसिध्द झालेपासून दिनांक **१६/०४/२०२६** रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत मोहोरबंद निविदा सादर करावयाच्या आहेत याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी. ज्यांना निविदा भरणेचे आहेत त्यांनी खालील अटीस पात्र राहून दिनांक **१६/०४/२०२६** रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे पोहोचतील अशा रितीने निवीदा सादर कराव्यात. **या सोबत Server बाबत माहितीसाठी Annexure-I जोडले आहे.**

DISTRICT COURT OF जिल्हा न्यायालय सत्यमेवजयते कोल्हापूर KOLHAPUR

हुकूमावरून,

सहा. अधिक्षक (वित्त),

दिनांक - १०/०४/२०२६ जिल्हा व सत्र न्यायालय,कोल्हापूर.

Annexure-I

Sr. No.	Name of Court Complex	Make and Model	Qty.
1	District Court, Kolhapur	Dell Power -Edge R440 Xeon Bronze 3106 Rack Mount Server	03
2	District Court-1, Ichalkaranji	Dell Power -Edge R440 Xeon Bronze 3106 Rack Mount Server	02
3	District Court-1, Gadhinglaj	Dell Power -Edge R440 Xeon Bronze 3106 Rack Mount Server	02
4	District Court-1, Jaysingpur	Dell Power -Edge R440 Xeon Bronze 3106 Rack Mount Server	01
5	Civil Court Sr.Dn. & Jr.Dn., Jaysingpur	Dell Power -Edge R440 intel Xeon Bronze 3106 Pedestal Server	02
6	Civil and Criminal Court, Panhala	Dell Power -Edge R440 intel Xeon Bronze 3106 Pedestal Server	01
7	Civil and Criminal Court, Peth Vadgaon	Dell Power -Edge R440 intel Xeon Bronze 3106 Pedestal Server	01
8	Civil and Criminal Court, Kagal	Dell Power -Edge R440 intel Xeon Bronze 3106 Pedestal Server	01
9	Civil and Criminal Court, Kurundwad	Dell Power -Edge R440 intel Xeon Bronze 3106 Pedestal Server	01
10	Civil and Criminal Court, Kale-Kheriwade	Dell Power -Edge R440 Xeon Bronze 3106 Rack Mount Server	01
11	Civil and Criminal Court, Chandgad	Dell Power -Edge R440 intel Xeon Bronze 3106 Pedestal Server	01
12	Civil and Criminal Court, Ajara	Dell Power -Edge R440 Xeon Bronze 3106 Rack Mount Server	01
13	Civil and Criminal Court, Malkapur-Shahuwadi	Dell Power -Edge R440 intel Xeon Bronze 3106 Pedestal Server	01
14	Civil and Criminal Court, Radhanagari	Dell Power -Edge R440 intel Xeon Bronze 3106 Pedestal Server	01
15	Civil and Criminal Court, Gargoti	Dell Power -Edge R440 intel Xeon Bronze 3106 Pedestal Server	01
		TOTAL	**20**

दुरूस्ती व देखभाल करणेसाठी नियम व अटी खालीलप्रमाणे

०१.	मोहरबंद निविदा हे मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर या नावाने दिनांक १६/०४/२०२६ इ. रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळून किंवा त्यापूर्वी या कार्यालयास पोहोचतील अशा बेताने सादर कराव्यात त्यानंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.
०२.	सदरहू दरपत्रक सूचनेतील नमूद **Servers** साठी कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसाो, कोल्हापूर याना राखून ठेवले आहेत.
०३.	कोणतीही एक अथवा सर्व दरपत्रके कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसाो, कोल्हापूर यांनी स्वत:कडे ठेवला आहे.
०४.	**Servers** ची वार्षिक देखभाल/दुरूस्ती करार हे जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व त्यांचे अधिपत्याखाली असणा-या तालुका न्यायालयांकरीता राहील.
०५.	मुख्यालयी असलेल्या अभियंत्यास दूरध्वनीव्दारे **Servers** दुरूस्ती संदर्भात तक्रार दिल्यास त्यांना त्याची नोंद घ्यावी लागेल व ती त्यांना स्विकारावी लागेल.
०६.	तालुका न्यायालयातील **Servers** दुरूस्त करते वेळी सुटे भाग दुरूस्ती करिता नेल्यास दोन दिवसाचे आत सदरहू सुटे भाग दुरूस्त करून जोडणे बंधनकारक राहील.
०७.	निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतिम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसाो, कोल्हापूर यांना राहतील.
०८.	वरील नमूद न्यायालयातील **Servers** हे Linux/Ubantu Operating System/Case Information System यासाठी वापरली जातात याची नोंद घ्यावी.
०९.	दरपत्रक मंजूर झाल्यावर संबंधितांस ५००/- रूपयाचे बॉन्डपेपरवर आपला करार करून द्यावा लागेल व सदरहू ५००/- रूपयाचे बॉन्डपेपरचा खर्च संबंधितांस सोसावा लागेल. सदरचा करार हा कराराचे दिनांकापासून एका वर्षाचा राहील.
१०.	वार्षिक देखभाल/दुरूस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर जसे की, (G.S.T Income Tax, etc) दरपत्रक मंजूर झालेल्या संबंधितांस / व्यावसायिकाला / सेवापुरवठादाराला सोसावे लागतील. या कार्यालयाकडून सदर प्रकारचे कोणतेही कर संबंधितांस अदा करणेत येणार नाहीत.
११.	**Servers** ची (Comprehensive) देखभाल/दुरूस्ती करार असल्यामुळे त्याचे विविध सुटे पार्ट दुरुस्त करणे व दुरूस्त न झाल्यास बदलून देणे करारामध्ये समाविष्ठ राहतील त्याबाबतचे वेगळे देयक अदा केले जाणार नाही.
१२.	देयक हे त्रैमासिक पध्दतीने सादर केल्यावर नियमानुसार अदा करणेत येईल.
१३.	देयक हे संपूर्ण तपशिलासह या कार्यालयाला सादर करावे लागेल.

१४.	राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळून देयक अदा करणेत येईल.
१५.	एखाद्या निविदाधारकाविरुध्द खरेदी प्रक्रियेसंदर्भात दिवाणी दावा अथवा फौजदारी खटला असल्यास त्यांनी निविदा भरु नयेत, तसे निदर्शनास आलेस कायदेशीर कारवाई केली जाईल.
१६.	पुरवठादारांनी या कार्यालयाने ज्या प्रकारचे साहित्याची मागणीची निविदा प्रसिध्द केलेली आहे त्याच प्रकारच्या साहित्याची निविदा भरणेची आहे. अन्य निविदेचा विचार केला जाणार नाही.

<u>प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.</u>

१) संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सुचित करणेत येते की, सदरील निविदा जिल्हा न्यायालय, कोल्हापूरचे (http://ecourts.gov.in/kolhapur) वेबसाईटवरती प्रकाशित करणेत यावी.

२) जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

३) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

४) मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

५) मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

६) मा. तहसिलदार, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

७) कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर नोटीस बोर्ड.